


# टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने जपला लोकमान्यांच्या विचारांचा वारसा

## संजय किर्लोस्कर, राजीवकुमार विष्णोई, प्रशांत दामले, डांगे यांचा विद्यानिधीने सन्मान

शतकोत्तरी वाटचाल पूर्ण केलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रीय शिक्षणाचा वारसा जपला असून, आजही हे विद्यापीठ लोकमान्यांच्या विचाराने पुढे जात आहे, असे मत टेहरी धरण प्रकल्पाचे शिल्पकार राजीव कुमार विष्णोई यांनी व्यक्त केले. विद्यापीठाचा 38 वा पदवीप्रदान सोहळा पार पडला. यावेळी ज्येष्ठ उद्योगपती संजय किर्लोस्कर, राजीवकुमार विष्णोई, प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले आणि ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांना सन्मानीय डी.लिट. (विद्यानिधी) देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी विष्णोई बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक, प्रभारी कुलगुरु डॉ. गीताली टिळक, टिमवि ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. रोहित टिळक, विश्वस्त डॉ. प्रणती रोहित टिळक, प्रभारी कुलसचिव डॉ. अभिजित जोशी आदी उपस्थित होते. किर्लोस्कर म्हणाले, मी 1975 मध्ये पदवी पूर्ण केली. त्यानंतर मला पदव्युत्तर पदवी मला घेता आली नाही, मात्र आज खऱ्या अर्थाने मास्टर डिग्री मला मिळाली असल्याने अभिमान वाटतो. माझे पणजोबा आणि लोकमान्य टिळक यांची भेट झाली होती. पणजोबांनी शेती अवजारांची कंपनी स्थापन केली होती. मात्र त्यांना इंग्रज अवजारांची विक्री करु देत नाहीत, त्यांच्याकडून कोणतेही सहकार्य मिळत अशी अर्धा तास चर्चा लोकमान्यांशी पणजोबांनी केली होती. त्यावेळी लोकमान्यांनी त्यांना विश्वास दिला होता, तुम्ही देशसेवेसाठी काम करीत आहात. स्वराज्य मिळाल्यावर तुमच्याकडून देशसेवेबरोबर व्यवसायदेखील जगाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाईल, अशी उभारी किर्लोस्करांना दिली होती. देशातील सर्वांत जुनी कंपनी म्हणून किर्लोस्कर कंपनीची ओळख असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

राजीवकुमार विष्णोई म्हणाले, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास शंभर वर्षे पूर्ण झाली असून आजही लोकमान्यांच्या विचाराने पुढे जात आहे. लोकमान्यांचा राष्ट्रीय शिक्षणाचा वारसा विद्यापीठाने जपला आहे. आयुर्वेद, विज्ञान, वैद्यकीय, नर्सिंग यांसह विविध शिक्षण क्षेत्रांत विद्यापीठाचा दिवसेंदिवस शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढत आहे. हेच विद्यापीठाचे वेगळेपण आहे. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या आधी 'टिमवि'ची स्थापना झाली असल्याने याचा खूप विद्यार्थ्यांना फायदा झाला असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

प्रभारी कुलसचिव डॉ. अभिजित जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलगुरु डॉ. गीताली टिळक यांनी विद्यापीठातील विविध विभागांचा आढावा घेतला. विद्यापीठाकडून सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असून अनेक विक्रमांतदेखील नोंद झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठात शिक्षण देण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन वसुंधरा काशीकर यांनी केले.